21/2/82

# महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद

## सटाणा, जि. नासिक

# अधिवेशन तिसरे

## ❋ ठराव ❋

२१ फेब्रुवारी १९८२

किंमत ३० पैसे

# दोन शब्द

महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषदेचे ३ रे अधिवेशन सटाणा जि. नाशिक येथे ता. २१ फेब्रुवारी १९८२ रोजी कॉ. संतराम पाटील यांचे अध्यक्षतेखाली यशस्वीरित्या पार पडले. या अधिवेशनाला महाराष्ट्र राज्याच्या २१ जिल्ह्यातून स्पृश्य, अस्पृश्य आदिवासी स्त्री-पुरुष प्रतिनिधी कार्यकर्ते हजर होते. श्रमिक संघटना, शहाद्याचे प्रतिनिधी चांगल्या संख्येने आले. म. रा. शेतमजूर युनियन व भूमिसेना ठाणे यांचे कार्यकर्ते सहभागी झाले. शेतकरी-शेतमजूर पंचायतीतर्फे उपस्थित रहाण्याचे ठरवून तसे करता आले नाही याबद्दल खेद व्यक्त करणारे व अधिवेशनाचे शुभचिंतनाबरोबरच अपेक्षा व्यक्त करणारे पत्र धाडले होते.

सटाणा अधिवेशनाने सालदार, महिनेदार अंगावरील व उक्ते काम करणारे व रोजगार हमी कामगारांनी त्यांच्या मागण्यांकरता एक दिवसाचा २३ एप्रिल १९८२ रोजी लाक्षणिक संप करावा. गावोगाव संप, सभा मिरवणुकीने साजरा करावा रोजगार हमी कामगारांनी कामावर गावात अगर तहसिल कार्यालय जवळ असल्यास तहसिल कार्यालयावर निदर्शने करावीत. शेतमजुरांचे वर्गऐक्याचा दिवस नांदी ठरावा.

हे घडवण्याकरता शेतमजुरांबद्दल आस्था असणाऱ्या व त्यांना संघटित करण्याच्या कामात असलेल्या संघटना व कार्यकर्त्यांशी चर्चा करून शेतमजूर परिषदेने एक बैठक बोलवावी असा विचार झाला. शेतकरी-शेतमजूर पंचायतीच्या पुढाकाराने रोजगार हमी कामगारांचे विधानसभेवर भव्य निदर्शन झाले त्यावेळी मागण्यांचा विचार झाला नाही तर ता. २३ एप्रिल रोजी संप करावा, आंदोलन तीव्र करावे असे संयोजकानी घोषित केले, ही एक सूचक घटना होती.

आठ एप्रिल रोजी मुंबई येथे बैठक झाली. त्याला महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद, शेतकरी-शेतमजूर पंचायत, म. रा. शेतमजूर युनियन, श्रमिक संघटना-शहादा व भूमिसेना-ठाणे, संघर्षवाहिनी व युक्रांद आदि संघटनांचे प्रतिनिधी हजर होते. या बैठकीने महाराष्ट्र राज्यातील शेतमजूर, सालदार, महिनेदार, रोजगार हमी कामगार व उक्त्या व अंगावरील कामे करणाऱ्या मजुरांच्या किमान वेतन आदि प्रश्नावर २३ एप्रिल रोजी होणारा संप व निदर्शने परस्पर सहकार्याने करण्याचा निर्णय घेतला व इतर संघटनांनी सहकार्य करावे असे आवाहनही केले. शेतमजूर व रोजगार हमी कामगारांच्या प्रश्नावर सातत्याने व परस्पर सहकार्याने आंदोलन संघटित करण्याच्या विचाराकरता ता. २३ एप्रिलनंतर या घटकांनी एकत्र जमण्याचा निर्णय घेतला आहे.

ता. १६-४-८२  
" श्रमिक " १२८९ सी, लक्ष्मीपुरी.  
कोल्हापूर

संतराम पाटील.  
अध्यक्ष

# महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद
# अधिवेशन तिसरे

**सटाणा ( जिल्हा नाशिक )**

# ठराव

## १) किमान वेतन निश्चिती व त्यासाठी आंदोलन

वाढत्या महागाईने व बेरोजगारीने संत्रस्त झालेल्या शेतमजुरांमध्ये असंतोष भडकत आहे व त्या असंतोषाचा काही ठिकाणी संघटित तर बऱ्याच ठिकाणी उत्स्फूर्त स्फोट होऊ लागला आहे. या पार्श्वभूमीवर मार्च १९८१ मध्ये नेमलेल्या तिसऱ्या शेतमजूर किमान वेतन समितीने आपला अहवाल ११ जानेवारी ८२ रोजी महाराष्ट्र राज्य सरकारला सादर केला. हा अहवाल अधिकृतरित्या प्रसिद्ध झाला नसला तरी समितीतील राज्यकर्त्या पक्षाच्या मंडळींनी त्यातील शिफारशींचा जाहीर उल्लेख करून त्यांची भलावण सुरू केली आहे. ढोबळमताने चौथ्या परिमंडळासाठी ६ रु. रोज, तिसऱ्यासाठी ७, दुसऱ्यासाठी ८ आणि पहिल्या बारमाही बागायत क्षेत्राच्या परिमंडळासाठी १० रु. रोज लागू करण्याची शिफारस केली असल्याचे समजते.

इंदिरा काँग्रेस पक्षाच्या माजी मंत्री व पुढारी मंडळींचाच मुख्यतः भरणा असलेल्या या समितीने इंदिरा काँग्रेस पक्षाच्या आदिवासी, दलित व ग्रामीण गरीब यांच्याबद्दलच्या जाहीर घोषणा व कार्यक्रम यांना इमानी राहण्यापेक्षा ते ज्या भांडवलदारी सधन शेतकरी वर्गाशी संबंधित आहेत त्या वर्गाचाच स्वार्थ शिफारशी करताना डोळ्यापुढे ठवलेला आहे असे या परिषदेचे मत आहे व या शिफारशींबद्दल परिषद नापसंती व्यक्त करीत आहे.

महाराष्ट्र राज्य सरकार हे महाराष्ट्रातील भांडवलदारी बागायतदार शेतकऱ्यांच्या प्रभावाखाली आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र सरकार स्वतःहून समितीच्या शिफारशींमध्ये शेतमजुरांच्या बाजूने सुधारणा करील अशी परिषदेची मुळीच अपेक्षा नाही. सर्व लहान-मोठ्या शहरांचे महागाई निर्देशांक दोन हजार पातळीचे वर गेले आहेत म्हणजे वस्तूंच्या किंमती २० पटीने वाढल्या असून रुपयाची किंमत फक्त ५ पैसे

झाली आहे. महागाई वाढतच जाणार आहे अशी सर्वांचीच खात्री झाली आहे. सर्व शेती मालाचे भाव भांडवलदार शेतकऱ्यांना भरपूर नफा व्हावा अशा रीतीने वाढवून मिळाले आहेत. म्हणून परिषदेने कि. वेतन समितीला सादर केलेल्या कैफियतीत तडजोडीच्या व्यवहार्य व शेतमजुरांना ताबडतोबीने आवश्यक भरपाई देऊ शकतील अशा दृष्टीने केलेल्या खालील मागण्यांचा आग्रहपूर्वक ही परिषद पुनरुच्चार करीत आहे.

१) परिमंडळे तीनच असावीत.

२) महानगरपालिकांच्या व आसपासच्या टापूतील जमिनी व बारमाही बागायती जमिनी १५ रु. रोज, नगरपरिषदांच्या व आसपासच्या टापूतील जमिनी व निमबागायती जमिनी १२ रु. रोज, जिरायत शेत जमिनी १० रु. रोज.

३ महिनेदार व सालदारांना या दराने येणाऱ्या हिशोबापेक्षा अधिक वेतन.

४) १८०० निर्देशांकावर दर अंकास दररोज १ पैसा महागाईभत्ता.

५ निमकुशल, कुशल, अतिकुशल काम करणाऱ्यांना अकुशलपेक्षा चढत्या प्रमाणात अधिक वेतन.

६) अंगावरील कामाच्या मजुरीच्या दरात सुधारणा.

७) बाल कामगारांना पूर्ण दराने वेतन.

८) निम्म्या दराने बकाम भत्ता.

९) निर्वाह निधी, निवृत्ती लाभ, आजारीपणाची व्यवस्था, अपघात नुकसान भरपाई व्यवस्था वगैरे सामाजिक संरक्षण योजना लागू करण

या निकडीच्या मागण्यांसाठी शेतमजूर, रोजगार हमी कामगारांनी गावोगाव संघटित होऊन तालुका पातळीवर आपले बळ एकवटून लढे उभारावे अशी ही परिषद हाक देत आहे हा लढ्याचा निर्धार महाराष्ट्रभर जाहीर करण्यासाठी ता. २३ एप्रिल १९८२ रोजी एक दिवसाचा गावोगाव राज्यव्यापी लाक्षणिक संप करावा व सभा, मिरवणुका वा संघटनात्मक स्थितीनुसार निदर्शनात्मक अन्य कृती करण्यास मोकळीक ठेवून हा दिवस पाळण्यात यावा, असा निर्णय ही परिषद घेत आहे. शेतमजूर व ग्रामीण गरिबांबद्दल आपुलकी बाळगणाऱ्या सर्व संघटनांनी त्यांना हा दिन राज्यभर व प्रत्येक गावी यशस्वी रीतीने साजरा करण्यास साहाय्य करावे असे आवाहन ही परिषद करीत आहे.

## २) कौशल्यानुसार शेतमजुरांचे वर्गीकरण करून किमान वेतन निश्चित झाले पाहिजे

शेती व्यवसायात यंत्राचा व विजेचा वापर वाढत आहे सुधारलेली, संकरित बीबियाणे व खतांचा व औषधांचा वापर, संकरित गाई पाळणे व दुग्धव्यवसाय, कुक्कुट पालन इत्यादी जोडधंद यांचे प्रमाण वाढत आहे. आधुनिक पद्धतीने मोठ्या प्रमाणावर

भांडवल गुंतवून शेती करणाऱ्या भांडवली शेतकऱ्यांच्या शेतीत मुकादम, मास्तर, सुपर-वायझर व कारकून नेमले जातात. शेतमजुरांचे किमान वेतन ठरविताना आतापर्यन्त महाराष्ट्र सरकारने केवळ अकुशल मजुरांचेच वेतन ठरविले. त्यामुळे कुशल व निमकुशल स्वरूपाचे काम करणारे कामगार, तसेच कारकून व देखरेख करणारे कामगार यांच्या वेतन ठरविण्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष झालेले आहे.

शेती व्यवसायात निरनिराळ्या प्रकारच्या पिकांतील निरनिराळ्या प्रकारच्या कामाकरिता एकूणच शेतीतील निरनिराळ्या कामाकरता निरनिराळे मजुरीचे दर देण्यात येतात. अंगावरच्या कामाच्या दरातही फरक असतो. महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर काही राज्यात किमान वेतन ठरवीत असता निरनिराळ्या पिकातील मजुरीचे दर वेगवेगळे ठरविले आहेत. महाराष्ट्रातही तसे करण्याची गरज आहे. केंद्र सरकारने केंद्र-शासित प्रदेशासाठी १५ सप्टेंबर १९८० रोजी किमान वेतनाचे सुधारित दर जाहिर केलेले आहेत. हे दर ठरवीत असताना कामगारांचे अकुशल, निमकुशल, कुशल, अतिकुशल, व कारकून असे पाच विभाग केले असून त्यांना वर्गीकरणानुसार वेगवेगळ वाढीव दर ठरविले आहेत. कामातील ज्ञान, अनुभव, कौशल्य, कष्ट, कामातील धोका, कामातील किळसवाणेपणा, शिक्षण, कामाचे स्वरूप इत्यादी घटकांचा विचार करून शेतमजुरांचे वर्गीकरण होणे जरुरीचे आहे.

वर्गीकरणाची तपशीलवार योजना या ठिकाणी मांडणे शक्य नसले तरी वर्गीकरणाच्या योजनेची रूपरेषा लक्षात यावी यासाठी काही उदाहरण देण्यात येत आहेत.

पेरणी करणारा, बैलांची-औतांची काम करणारा, औषध फवारणी करणारा, रानबांधणी व लेव्हलिंग करणारा, दूध काढणारा, छाटणी करणारा इत्यादी प्रकारच्या शेतमजुरांचा समावेश निमकुशलमध्ये करण्यात यावा. ट्रॅक्टर ड्रायव्हर, इंजिन ड्रायव्हर, बाथरमन, मळणी मशीन चालविणारा, सुतार, गवंडी, माळी इत्यादींचा समावेश कुशल कामगारांत करण्यात यावा. मेकॅनिक, इलेक्ट्रिशिअन इत्यादींचा समावेश अतिकुशलमध्ये करण्यात यावा. कारकून, मास्तर, मुकादम, सुपरवायझर इत्यादींचे वेगळ वर्गीकरण करण्यात यावे.

अकुशल शेतमजुरांपेक्षा निमकुशल मजुरांस २५ टक्के अधिक, कुशल मजुरास ५० टक्के अधिक, अतिकुशल मजुरांस १०० टक्के अधिक व कारकुनी काम करणाऱ्यास ४० टक्के अधिक वेतन देण्यात यावे.

शेतमजूर परिषदेच्या कार्यकर्त्यांनी आपआपल्या भागातील प्रमुख पिके व शेतीशी संबंधित इतर व्यवसाय व जोडधंदे यातील विविध कामांची माहिती जमा करावी व त्या आधारे परिषदेने वर्गीकरणाची निश्चिती करावी. या संबंधीचे मागणीपत्र तयार करून राज्यभर त्यासाठी आंदोलन उभे करावे असा निर्णय ही परिषद घेत आहे.

### ३) अंगावरील, उक्त्या कामांचे किमान वेतन दर निश्चित झाले पाहिजेत

शेतीव्यवसायात मजुरांच्या गटांना अंगावर कामे देण्याची, उक्ती कामे देण्याची पद्धती अलिकडील काळात भांडवली शेतकरी मोठ्या प्रमाणावर सार्वत्रिक वापर करू लागले आहेत. पुरुषाप्रमाणच स्त्रियांना अशी अंगावर कामे दिली जात आहेत. थोडी अधिक मजुरी मिळावी म्हणून तगडे तरुण शेतमजूर स्त्री पुरुष अंगावरील कामे घेतात व जीवापाड मेहनत करून व ताण घेऊन कामे करतात. रोजंदारी मजुरापेक्षा थोडे अधिक वेतन हातात येत असले तरी कितीतरी पटीने अधिक श्रम करावे लागतात त्याची भरपाई होत नाही. फार थोड्या काळात या प्रकारची कामे करणाऱ्यांची प्रकृती क्षीण होते असा अनुभव आहे भुसार पिकांची राखण करून, कापणी मळणी करून धान्य तयार करून देण्याचे काम उक्ते किंवा खोती पद्धतीने पिकांच्या वाट्यावर घेतले जाते यामध्ये मजुराला व त्याच्या कुटुंबियातील सर्वांना काही काळ निश्चितपणे काम मिळण्याची शाश्वती मिळत असल्याने रोजंदार पेक्षा कमी मजुरी पडत असूनही अशी कामे मजूर घेतात.

अशी कामे घेणारे मजूर लवकर थकून जातात. अशारीतीने अंगावर कामे देण्याची पद्धत ही कामाच्या तासावर निर्बंध येऊ लागल्यावर व किमानवेतन निश्चिती होऊ लागल्यावर या बंधनांना बगल मारुन शेतमजुरांची पिळवणूक तीव्र करण्याचा ग्रामीण भांडवलदारांचा मार्ग आहे. या मार्गाने देखरेखीचा खर्चसुद्धा ते वाचवतात. म्हणून शेतमजूरांचे किमान वेतन निश्चित करात असताना अंगावरील कामाचे ( उक्त्या, कंत्राटी कामाचे ) किमान दर निश्चित झाले पाहिजेत. प्रत्येक प्रकारच्या पिकास व त्यावरील प्रत्येक प्रकारच्या कामास भागाभागात एक एकराचे काम १ दिवसात करण्यास किती मजूर लागतात याचे प्रमाण निश्चित करुन व या मजुरांना किमान वेतनाएवढी किमान मजुरी पडेल अशारीतीने या कामाचे किमान दर ठरविले पाहिजेत. उदाहरणार्थ – उसाची मोठी खांदणी करण्यास एक एकर क्षेत्रास १२ पुरुष लागतात. बागाईत भागात १५ रु किमान वेतनाची मागणी या परिषदेने केली आहे हे लक्षात घेऊन एक एकर उसाचे खांदणीस १८० रु. किमान दर मिळाला पाहिजे. एक एकर आडसाली उसाची लागवड करण्यास, बेणे तोडणे, खांदणे, वहाणे इत्यादी कामापासून बेणे बुजविण्यापर्यंतची कामे करण्यास सर्वसाधारणपणे एक दिवसास ८ गडी व १२ बाया लागतात. या वीस मजुरांची १५ रु. रोजाप्रमाणे किमान मजुरी ३०० रु. होते. ऊस लागवडीपूर्वी ५ गुंठ्यांची रानबांधणी करण्यास एकरी ८ गडी व लागवडीपूर्वी १५ फुटावर भुंडी घालण्यास एकरी २ गडी याप्रमाणे १० गडी लागतात व त्यांची किमान मजुरी १५० रु. होते. याप्रमाणे रानबांधणीसह उसाची लागवड करण्यास एक एकरास ४५० रु. उक्त्या कामाची किमान मजुरी मिळावयास पाहिजे. सध्या केवळ रु १५० ते २५० याप्रमाणे दर मिळतो. एक एकर गव्हाची कापणी करणे, सरवा वेचणे,

पेंढया बांधणे, वाहतूक करणे व मळणी यंत्रावर मळणी करून, धार देऊन, पोती शिवून वजन करण्यापर्यंतच्या कामास एकरी एक दिवसास २२ बाया व गडी लागतात. या हिशोबाने १५ रु रोजाप्रमाणे एकरी ३३० रु. किमान मजुरी उक्त्या कामाची मिळावयास पाहिजे. प्रत्यक्षात सध्या पोत्यास सुमारे ७ किलो गहू या हिशोबाने एकरी सात पोती उत्पादन धरल्यास सुमारे ५० किलो म्हणजे केवळ सुमारे पाच रु. मजुरी मिळते.

पिकाचे क्षेत्र बरोबर मोजले जाणे (प्रत्यक्ष कामापेक्षा कमी क्षेत्र कित्येक वेळी मोजले जाते) हिशोब योग्य रीतीने करणे, केलेल्या कामाची मजुरी वेळच्या वेळी देणे इत्यादी-बाबत शेतमालाचे व उक्ते काम घेणाऱ्यांचे अनेकवेळी तंटे निर्माण होतात. हे तंटे सोडविण्यासाठी यंत्रणा निर्माण झाली पाहिजे, याकरिता उक्त्या कामाचे लेखी करार करून ग्रामपंचायत कार्यालयात नोंदविण्यासंबंधी नियम झाला पाहिज.

अहमदनगर जिल्ह्यात कोपरगाव तालुक्यात उसाच्या लागवडीचा मजुरीचा दर प्रत्येक एकरास ३०० असावा या मागणीसाठी १९८१ साली शेतमजुरांनी अनेक गावांत संप केला होता. निरनिराळ्या पिकांच्या, निरनिराळ्या कामांच्या हंगामात अंगावर कामाच्या पद्धतीने काम करणाऱ्या मजुरांच्या टोळ्यांची संघटना उभारणे व दरवाढी-साठी त्यांचे आंदोलन उभारणे शक्य आहे हे या लढ्यातून दिसून आले आहे. महाराष्ट्रात व देशात अशा प्रकारच्या मागणीवर अनेक लढे झालेले आहेत. शेतमजुर परिषदेच्या कार्यकर्त्यांनी रोजंदारी, महिनेकरी, सालगडी यांना संघटित करीत असतानाच अंगावरील कामाच्या पद्धतीने काम करणाऱ्या मजुरांना संघटित करण्याकडेही लक्ष पुरवावे असे आवाहन ही परिषद करीत आहे.

## ४) रोजगारहमी संबंधी

रोजगार हमी योजना महाराष्ट्र राज्य शासनाच्या अंदाजपत्रकाचा स्थायी भाग बनली आहे तरीही ग्रामीण गरिबांना काम मिळण्याच्या बाबतीत शाश्वती व नियमित-पणा नाही. कामे संपली, कामे नाहीत हीच ओरड सार्वत्रिक ऐकू येते. खूप खटपट केल्यानंतर व खटपटीत अनेक दिवस वाया घालविल्यानंतर वरिष्ठांच्या कलाने एखादे काम निघते. पण ते काम संपताच पुन्हा येरे माझ्या मागल्या अशी गत होते. बेकारीच्या जोडीला भरीस भर म्हणून रोजगार हमी योजनेतील कामावरील मजुरीत घट होते आहे. पाझर तलावासारख्या कामावर सर्वात जास्त घट आहे.

काम मागणाऱ्या जनतेचा जेव्हा दबाव वाढतो तेव्हा त्याना काम देण्याचे निमित्त करून जी कामे सरकारी खात्याकडून चालतात तेथील अधिक वेतनावर असलेल्या कामगारांत कपात करून कमी वेतनावर रोजगार हमीची कामे म्हणून खात्याची कामें व योजनाअंतर्गत काम करुन घेण्याचा

पायंडा सरकारने पाडला आहे. खात्यातील कामगारांनी संघटित चळवळ करुन जे मिळवले ते उधळून लावणे व गरीब गरजूंना आम्ही काम देतो असा टेंभा मिरविणे असा हा प्रकार आहे. खेड्यापाड्यात बेकारी इतकी आहे की, शेती हंगामात सुद्धा लोक बेकार रहातात. म्हणून १२ महिने रोजगार हमीखाली काम मिळाले पाहिजे. रोजगार हमी कामात कंत्राटाने कामे देण्याची पद्धत शिरली आहे. ती संपूर्णपणे बंद करावी. रोजगार हमीत कामाची हमी नाही. तुटपुंजा एक रुपया निर्वाहभत्ताही कोणाच्या पदरात पडत नाही. तेव्हा काम द्या व काम न दिल्यास वेतनाच्या किमान निम्मी रक्कम निर्वाहभत्ता द्या अशी मागणी ही परिषद करीत आहे.

अलीकडेच महाराष्ट्र शासनाने दोन ठराव करून खाजगी शेती विकासाची, ग्रामविकासाची व मध्यम व छोट्या धरणांची, वनविकासाची कामे रोजगार हमीमार्फत करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी ग्रामपंचायत व जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ताब्यात केन्द्र सरकारकडून राज्याना मिळणाऱ्या रकमा दिल्या जाणार आहेत.

या निर्णयामुळे ताबडतोबीने काही काळ तरी प्रत्येक गावी व गावाच्या पंचक्रोशीत काम देणे शक्य होणार आहे ही गोष्ट लक्षात घेऊन आपआपल्या गावातच व गावच्या आसपास काम मिळण्याबद्दल व किमान १० रु. रोज पडेल अशा रीतीने कामाचे दर करण्याबद्दल संघटीत आग्रह धरण्याचे, रोजगार हमी कामासाठी ठेवलेल्या या रकमतून एक पैसासुद्धा ग्रामीण प्रतिष्ठितांच्या व नोकरशाहीच्या भ्रष्टाचारापायी वाया जाणार नाही अशी दक्षता घेण्याचे आंदोलन सुरू करण्याची व हे आंदोलन संघटित करण्यासाठी शेतमजूर परिषदेत स्थायी पद्धतीने संघटित होण्याची हाक ही परिषद ग्रामीण गरिबांना देत आहे.

**५. विस्थापितांचे पुनर्वसन कायद्यामध्ये आवश्यक त्या दुरूस्त्या करून त्या कायद्याची अमलबजावणी करा. शेतमजुरांना कायद्याचा लाभ मिळालाच पाहिजे.**

महाराष्ट्रात जलसंपत्तीचा पुरेपर वापर करून प्रत्येक एकर लागवडीयुक्त जमिनीतून एकातरी पिकाची हमी निर्माण करण्याची शक्यता असताना, दुष्काळाच्या संकटाला वेळोवेळी तोंड द्यावे लागत असलेल्या व १९७१-७२-७३ साली सलग तीन वर्षे दुष्काळाचा फटका बसलेल्या महाराष्ट्रातून दुष्काळाचे निर्मुलन करण्यासाठीं व ग्रामीण बेरोजगारांना उत्पादक कामे सतत मिळण्यासाठी छोट्या-मोठ्या पाणी पुरवठा योजना सार्वत्रिक प्रमाणावर हाती घेऊन गतीने पार पाडण्यात महाराष्ट्र शासन अक्षम ठरले आहे असे ही परिषद नमूद करीत आहे.

लोकमताच्या दडपणाखाली व आवश्यक अशा धरण व प्रकल्पांचा हाती घेतलेल्या

योजनांमुळे विस्थापित होणाऱ्या शेतकरी, त्या गावातील कारागीर व जमिनीवर जीवन अवलंबून असलेल्या भूमिहीन शेतमजूर यांची महाराष्ट्र सरकारने आजवर अक्षम्य हेळसांड केलेली आहे. त्यामुळे विकासासाठी आवश्यक असलेल्या धरण, प्रकल्प व इतर योजनांस आपद्ग्रस्त बनणाऱ्यांकडून निरनिराळ्या स्वरूपात विरोध निर्माण होण्यास सरकारच कारणीभूत ठरले आहे, असे ही परिषद जाहीर करते.

धरण व प्रकल्पग्रस्तांचे विकसनशील पुनर्वसन होण्यासाठी कायदा व्हावा यासाठी कित्येक वर्षे महाराष्ट्रात चळवळ चालू होती. त्या चळवळीच्या परिणामी व कायद्या-शिवाय पर्याय नाही, सबब सांगून जमत नाही; चालढकलीने चालत नाही. असे दिसल्या-नंतर महाराष्ट्र सरकारने १९७६ साली एक कायदा केला व त्याची अंमलबजावणी करण्यास आता कुठे कुठे फुटकळ प्रमाणात शासनाकडून सुरुवात होत आहे. परंतु या थोड्याशा अनुभवातूनही त्या कायद्यातील अनेक त्रुटी उघड झाल्यामुळे अंमलबजावणी होऊ शकली नाही. त्यात सुधारणा होण्याची गरज आहे असे या परिषदेचे मत आहे. काही महत्त्वाच्या उणिवांची फक्त नोंद खाली करीत आहोत.

## विस्थापितांसंबंधी

रस्ते, इमारती, रेल्वे, विमानतळ,पाझर तलाव, पाट, चाऱ्या, वीज व लहानमोठे धरण प्रकल्प आदी कोणत्याही प्रकल्पासाठी ज्यांच्या ज्यांच्या जमिनी सार्वजनिक कामासाठी म्हणून शासन संपादन करते. जे जे त्या जमिनीवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या अवलंबून असतात त्या त्या सर्वांचा विस्थापितांच्या व्याख्येत समावेश झाला पाहिजे विस्थापितांचे पुनर्वसन करताना कुटुंबातील ज्यांच्या नावे जमीन असेल,त्याचाच व जमिनीच्या क्षेत्राच्या प्रमाणातच विचार न होता कुटुंबातील व्यक्तींच्या संख्येच्या प्रमाणात पुनर्वसनाचे फायदे मिळाले पाहिजेत, अशी तरतूद या कायद्यातही होणे आवश्यक आहे. जमीन, झाडे, विहिरी घरे, खळीवाडगी आदींच्या नुकसान भरपाईपोटी किंमत ठरवीत असताना प्रचलित कसोट्या अपुऱ्या पडतात. तेव्हा त्याबरोबर किंबहुना सर्वात महत्त्वाची कसोटी ही असावी की, विस्थापितांचे विकसनशील पुनर्वसन करीत असताना नुकसान भरपाईची रक्कम वजा जाता त्यांच्यावर नवीन कर्जाचा वा अन्य बोजा वाढणार नाही अशी दक्षता घेण्यात आली पाहिजे.

## २) लाभधारकासंबंधी

आठ एकरापेक्षा कमी क्षेत्र धारकांना वगळून त्यापेक्षा जास्त क्षेत्र धारकांचे टप्पे पाडून व चढत्या टप्प्यातील धारकांकडून वाढत्या प्रमाणात जमीन संपादन करण्याची तरतूद कायद्यात आहे ती दिसायला न्याय्य वाटत असली तरी त्यातून निसटण्यासाठी खातेफोड करुन बहुतेकजण आठ एकरांच्या आत येण्याचा किंवा अगदी खालच्या टप्यात येण्याचा प्रयत्न करतात. कोर्ट कचेरी व वकिलांसाठी भरमसाठ खर्च यासाठी चालू आहे.

काही प्रसंगी मोठ्या कुटुंबातील एकाद्याच्याच नावाने खाते असल्यास व त्याने कोर्ट कचेरीकडे धाव न घेतल्यास त्यावर मात्र अन्याय होतो. तेव्हा लाभ क्षेत्रात सुद्धा जमीन संपादन करताना खालील गोष्टी करण्यात याव्यात.

अ) कुटुंब घटक न धरता व्यक्तीगणिक क्षेत्र किती आहे हे पाहण्यात यावे व त्यावर भूसंपादन निश्चित करावे.

ब) हंगामी पाणी पुरवठा होणाऱ्या लाभक्षेत्रातून टक्केवारीने दहा टक्के क्षेत्र संपादन करण्यात यावे तर बारमाही पाणी पुरवठा होणाऱ्या लाभ क्षेत्रातून त्याच्या दुप्पट म्हणजे वीस टक्के क्षेत्र संपादन करण्यात यावे.

क) ज्यांचे जमिनीचे प्रतिव्यक्ती क्षेत्र सरासरीइतके किंवा कमी असेल त्याच्याकडून जमीन काढून न घेता ज्यांचेकडे प्रतिव्यक्ती क्षेत्र जास्त आहे त्यांचेकडून काढण्यात यावी. त्यांचे टप्पे पाडून ज्यांचे क्षेत्र प्रतिव्यक्ती जास्त असेल त्यांच्याकडून वाढत्या प्रमाणात जमीन संपादन करावी.

ड) ज्या प्रकल्पांचे लाभ क्षेत्र निश्चित करता येणे शक्य आहे त्या सर्व आतापर्यंत पूर्ण झालेल्या, चालू असलेल्या व येथून पुढे कार्यान्वित होणाऱ्या व पुर्ण होणाऱ्या लहान मोठ्या प्रकल्पांना हा कायदा लागू करण्यात यावा व तो लागू करणे शासनाच्या हाती न ठेवता आपसूक लागू होईल अशा कायद्यात तरतूद करण्यात यावी

इ) वर 'अ' ते 'ड' मध्ये सुचविल्याप्रमाणे विना अपवाद भूसंपादन करण्यात यावे त्याची राज्यपातळीवर गंगाजळी करावी व त्यातून सर्व विस्थापितांचे विकसनशील पुनर्वसन करुन शिल्लक राहिलेली जमीन ते प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी अंगमेहनतीचे श्रम केलेले असतील अशा रोजगार हमीवरील अगर तत्सम कामगारांना नवीन शर्तीने कसण्यासाठी देण्यात यावी.कारागीर व शेतमजुरांनाही जमीन देण्यात यावी.

३) प्रत्येक धरणाच्या, प्रकल्पाच्या कामास सुरूवात होण्यापूर्वी पुनर्वसनाचा आराखडा, विस्थापितांना मिळावयाच्या जमिनीच्या सर्व नंबरसहित, संपूर्ण तपशीलासह, जाहीर करण्यात यावा.

४) वर फक्त काही महत्वाच्या प्रश्नांसंबंधी नोंद केली आहे व सूचना केल्या आहेत पुनर्वसन कायद्याची बारकाईने छाननी करून तो जास्तीत जास्त उपयुक्त, सुलभ व कोर्टबाजीला कमीत कमी वाव ठेवणारा करण्याचे दृष्टीने महाराष्ट्र शासनाने त्वरित 'महाराष्ट्र राज्य धरण व पुनर्वसन परिषद' व 'महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद' यांच्या प्रतिनिधींशी विचार विनिमय करून घ्यावेत व त्याची विनाविलंब कार्यवाही करावी अशी मागणी ही परिषद महाराष्ट्र शासनाकडे करीत आहे.

## ६) जमिनीचे फेरवाटप झाले पाहिजे

रोजगार हमीवर कामे मिळण्याबद्दल वानवा वाढत आहे. खाजगी मालकांच्या शेतीची सुपिकता वाढवण्याची कामे रोजगार हमीखाली घेतली जावू लागली आहेत.

अपुरी मजुरी व वाढती महागाई यामुळे भूमिहीनांना व शेतमजुरांना जगणे कठीण होत आहे. ज्यांच्याकडे जमीन असेल त्यालाच विकास योजनांचा लाभ घेता येतो अशी आजची स्थिती आहे. या सर्व रोज येणाऱ्या अनुभवांमुळे जमिनीच्या फेरवाटपाची, प्रत्यक्ष जमिनीवर कष्ट करणाऱ्याला जमिनीच्या भोगवटयाचा हक्क मिळण्याची मागणी ग्रामीण गरिबांमधून तीव्रतेने पुढे येत आहे.

अस्मिता जागृत होऊ लागलेल्या दलित व अदिवासी समुदायांना खरीखुरी सामाजिक व सांस्कृतिक समानता प्राप्त करून घेण्यासाठी शेतीसह सर्व सामाजिक उत्पादन कार्यात आपल्याला सन्मानपूर्वक संधी मिळणे आवश्यक आहे याची जाणीव या समुदायात वाढत आहे.

अशा रीतीने आपल्या देशाच्या अपुऱ्या राहिलेल्या लोकशाही क्रांतीचा एक प्रमुख कार्यक्रम असलेला मूलगामी शेतीसुधारणेचा म्हणजेच जमिनीच्या फेरवाटपाचा कार्यक्रम पार पाडण्याचा निकडीचा व देशाच्या शेती तसेच औद्योगिक विकासाच्या दृष्टीने कठीण प्रश्न बनत चालला आहे.

गेल्या ३५ वर्षात स्वातंत्र्योत्तर काळात जुन्या प्रकारच्या अव्वल जमिनदारीवर कमीअधिक बंधने घातली गेली आहेत आणि शेतीचे फार मोठया प्रमाणावर बाजारीकरण होऊन शेतीमध्ये भांडवली संबंधाची वाढ होत आहे. यामुळे शेती जमिनीतील मालकी संबंधाचे चित्र मोठया प्रमाणात बदलले असून जुन्या प्रकारच्या जमिनदारी मालकाच्याऐवजी भांडवलदार शेतकरी, भांडवली जमीनदार यांच्या हातात जमिनीचे केंद्रीकरण वाढत आहे. या नवीन परिस्थितीत भांडवलदार शेतकरी व भांडवली जमीनदार हे मूलगामी जमीनमालकी संबंध सुधारण्याच्या कार्यक्रमाचे, शेतीच्या फेरवाटपाचे खरे कट्टर विरोधक बनले आहेत. भांडवली राज्यसत्तेचा महत्वाचा घटक असलेल्या या भांडवलदार शेतकर वर्गाचे ग्रामीण जीवनावरील सर्वांगीण वर्चस्व नष्ट करुन व त्यांचा राजकीय, सामाजिक पाडाव केल्याशिवाय जमिनीच्या फेरवाटपाचा लोकशाही कार्यक्रम पार पाडता येणार नाही, असा गंभीर इशाराही परिषद देत आहे.

शेतमजूर परिषदेच्या बारामती येथील दुसऱ्या अधिवेशनाच्या ठरावात केलेल्या मांडणीचा पुनरुच्चार करून, ही परिषद स्पष्ट करीत आहे की, देशातील शेतजमिनीचे आजचे वाटप अत्यंत विषम आहे. १० टक्के लोकांकडे पन्नास ते साठ टक्के जमीन आहे व तीस ते साठ टक्क्याकडे केवळ दहा टक्के जमिन आहे अथवा जमिनच नाही आणि मधल्या तीस टक्क्याकडे तीस टक्क्याच्या जवळपास जमिन आहे. स्वतः कसणाऱ्याला जमीन या तत्वावर करावयाच्या फेरवाटपाने स्वतःच्या व कुटुंबाच्या श्रमाने जमीन कसणाऱ्या मधल्या तीस टक्क्यांना कोणत्याही प्रकारे धक्का बसणार नाही

अशी ग्वाही ही परिषद देत आहे. भूमिहीन शेतमजूर व गरीब शेतकरी या मजूरदार ग्रामीण गरीब जनतेला जमीन भोगवाटयाचा हक्क फेरवाटपासून मिळावयाचा आहे.वरच्या दहा टक्क्यांकडील पन्नास ते साठ टक्क्यापैकी पंचवीस ते तीस टक्के एकूण लागवडीखालील जादा जमीन काढून घेऊन ग्रामीण गरिबांना सहकारी पद्धतीने शेती करण्यासाठी सरकारी सहाय्यासकट मिळाल्यास देशाच्या शेतीची दुष्काळ व पूर यापासून मुक्तता करण्याकरिता प्राकृतिक स्वरूप बदलण्याचा आवश्यक कार्यक्रम पार पाडण्यासाठी व प्रत्येक एकराला एका पिकासाठी पुरेसे पाणी मिळेल अशी व्यवस्था करण्यासाठी जोमदार श्रमाची जी प्रचंड गुंतवणूक करणे आवश्यक आहे ती आपला देश करू शकेल. अधिक रोजगाराची निर्मिती आणि उद्योग धंद्याची वाढ व विकास यासाठी जमीन फेरवाटणीची आवश्यकता आहे. प्रचलिता भांडवली पद्धतीने हे कार्य कधीच साध्य होऊ शकणार नाही.

म्हणून ही परिषद स्पष्ट इशारा देत आहे की, कोणत्याही भांडवली पक्षाचे सरकार अथवा भांडवली पक्षांच्या आघाडीचे सरकार हे फेरवाटप घडवू शकणार नाही. एखादे कष्टकरी जनतेच्या पक्षाचे सरकार निवडणुकातून अधिकार पदावर आले तरी प्रचलित शासनयंत्रणेद्वारे मुलकी, फौजदारी, न्यायालयीन, सैनिकी वगैरे यंत्रणेद्वारे, ती यंत्रणा विशेषतः तिचा वरचा नियंत्रक विभाग अधिकारावर असेपर्यंत जमिनीचे समतत्वावर फेरवाटप करू शकणार नाही. म्हणून भांडवली सरकारांचा पाडाव करून भांडवली शासन मुळासकट बदलून जनतेची लोकशाही सत्ता प्रस्थापित करण्याच्या मार्गानेच ग्रामीण गरिबांना जमिनीच्या फेरवाटपाचा व त्याच्या विकनशील उपयोगाचा आवश्यक लोक-शाही कार्यक्रम पार पाडावा लागणार आहे त्यासाठी, जनतेच्या लोकशाहीच्या स्थापनेच्या लढ्यासाठी क्रांतीकारक कामगारवर्गाच्या पुढारीपणाखाली शेतमजुरादी गरीब शेतकरी ग्रामीण गरिबांना कामगार वर्गाच्या खांद्याला खांदा लावून लढले पाहिजे आणि मध्यम शेतकऱ्याला या लढ्यात साथीला घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न शेतमजूर, गरीब शेतकरी आंदोलनाने केला पाहिजे.

## ७) महागाई, बेरोजगारीसंबंधी

वाढती महागाई, वाढती बेकारी ही भांडवलशाहीच्या शेवटच्या अवस्थेची कायमची लक्षणे बनली आहेत. औद्योगिकदृष्टया पुढारलेल्या व संपन्न असलेल्या अमेरिका, पश्चिम जर्मनी, जपान यासारख्या भांडवली देशांमध्ये ही लक्षणे वाढत्या प्रमाणात ग्रासत आहेत. इंग्लंड, फ्रान्स आदि देशांची स्थिती अधिकच वाईट झाली आहे. भारतासारख्या मागास व अजूनही परावलंबी असलेल्या तिसऱ्या जगातील देशात तर ही दोन्ही भांडवली अरि-ष्टाची लक्षणे पराकोटीला जात आहेत. बँक भांडवलदार, कारखानदार भांडवलदार, व्यापारी भांडवलदार, सधन शेतकरी भांडवलदार या सर्व भांडवलदारांच्या नफेखोरीतूनच ही महागाई व बेकारी जन्माला येते. उत्पादनाची, विभाजनाची व कारभाराची सूत्रे भांडवलदारांच्या हातात असेपर्यंत ही महागाई व बेकारी कमी न होता वाढतच जाणार

आहे, असे ठाम मत ही परिषद व्यक्त करीत आहे. तसेच भांडवलदारांची सत्ता नष्ट करून कामगारवर्गाच्या पुढाकाराखाली जनतेची खरीखुरी लोकशाहीसत्ता प्रस्तापित केल्यानंतर उत्पादन, विभाजन व कारभार कष्टकऱ्यांनी स्वतःच्या हातात घेतल्यानंतरच महागाई व बेकारीचे निर्मूलन होऊ शकेल तोपर्यंत महागाईची पुरेपूर भरपाई करु शकेल इतकी पगारवाढ, महागाईभत्ता वाढ, तसेच काम द्या नाहीतर वेतनाच्या किमान निम्मा निर्वाहभत्ता द्या इत्यादी मागण्यांसाठीचे लढे कामगारांनी निर्धाराने, प्रखरपणे लढले पाहिजेत. महागाईभत्ता वाढीने महागाई वाढते ही भांडवलदारांची कोल्हेकुई खोटी व फसवी आहे. नफेखोरीमुळे होणाऱ्या महागाईपासून बचाव करण्यासाठी महागाईभत्ता वाढ व पगारवाढ कामगारांना व शेतमजुरांना मिळवावी लागते व हा त्यांचा लढा न्याय्य आहे या लढ्यांतून पुढील परिवर्तनाची तयारी होणार आहे, असे या परिषदेचे ठाम मत आहे

जथे कामगारवर्गाच्या पुढाकाराने कष्टकऱ्यांची सत्ता प्रस्थापित होऊन उत्पादनाच्या क्षेत्रात समाजसत्तावादाची प्रस्थापना झाली आहे, त्या देशात जनतेच्या जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढू न देण्यात त्यांनी यश मिळविले आहे. एवढेच नव्हे तर ज्या उपभोग्य वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले आहे त्या वस्तू स्वस्तसुद्धा केल्या आहेत त्या देशात जे अंतर्गत संघर्ष आहेत ते विभाजनाच्या, कारभाराच्या व एकूण सांस्कृतिक क्षेत्रात समाजसत्तावादी पुनर्बांधणी झाली पाहिजे, कम्युनिस्ट समाजरचनेच्या दिशने आगेकूच केली पाहिजे, समाजसत्तावादी देशातील जनतेने क्रियाशीलपणे भांडवली देशातील कष्टकरी जनतेच्या क्रांतीकारक चळवळीला मदतकारक झाले पाहिज व त्याद्वारे जागतिक शांततेचा लढा मजबूत केला पाहिजे या दिशेने क्रमात आकार घेणारे आहेत. भांडवलदारी वर्तमानपत्र हा संघर्ष समाजसत्ताविरुद्ध व भांडवलशाहीच्या पुर्नःस्थापनेचा लढा आहे असा आभास बुद्धीपुरस्कर निर्माण करीत आहेत व भांडवली देशातील जनतेला फसवून समाजसत्तावादाच्या क्रांतिकारक चळवळीपासून तिला विचलित करू पाहत आहेत. तेथेही भांडवली देशाप्रमाणेच महागाई वाढत आहे असा धादांत खोटा प्रचार करीत आहेत. या प्रचाराकडे दुर्लक्ष करून पगारवाढीसाठी अधिकाधिक वर्गीय एकजुटीने, व्याप्तीने, संघटितपणे लढे लढत समाजसत्तावादी मार्गावर दृढ विश्वासाने, जनतेची खरीखुरी लोकशाही सत्ता प्रस्थापित करण्याच्या दिशेने, कष्टकरी जनतेचे बळ संघटित करीत व एकवटून पुढे जाणं हाच जनतेला जर्जर करणाऱ्या महागाई व बेकारीचे निर्मूलन करण्याचा एकमेव मार्ग आहे असे ही परिषद जाहीर करीत आहे.

## ८) गरीब शेतकऱ्यांना हाक

अपुरी जमीन असलेला व त्यामुळे स्वतःच्या शेतीची कष्ट मशागत करत असतानाच दुसऱ्याच्या शेतावर व इतर ठिकाणी मजुरी करणाऱ्या गरीब शेतकऱ्याच्या शेतीची व गरीब शेतकऱ्यांची महागाईने सध्या दैना चालली आहे. अर्ध शेतमजूर असलेल्या व रोजगार हमीवर कामावर जावे लागणाऱ्या या गरीब शेतकरी समुदायानी स्वाभिमानाने

स्वतःला शेतमजूर म्हणवून घेऊन शेतमजूर संघटनेचे सभासद झाले पाहिजे. शेतमजुरांच्या मजूरीवाढ वगैरे दैनंदिन मागण्यांसाठी तसेच जमिनीचे श्रमतत्वावर फेरवाटप व शर्तीचे सहकारीकरण आणि जमिनीचे प्राकृतिक स्वरूप बदलण्याचा व पाणी पुरवठ्याचा कार्य-क्रम यासाठी भूमिहीन शेतमजुरांशी भक्कमपणे एकजुटीने उभे राहून सधन शेतकऱ्यांच्या ग्रामीण जीवनावरील सर्वांगीण वर्चस्वाविरूद्ध लढ्याचे निशाण फडकविले पाहिजे.ग्रामीण गरिबांमध्ये फूट पाडण्यासाठी आता श्रीमंताना धर्म जात वगैरे आठव लागले आहे आणि या जुन्या संस्काराच्या सहाय्याने स्वतःच्या गोतावळ्यातील मध्यम शेतकऱ्यांना तर ते चिथावत आहेतच शिवाय सवर्ण, गरीब शेतकऱ्याना व शेतमजुराना दलित व आदिवासी गरिबांच्या विरूद्ध चिथावण्याच्या कारवाया चालल्या आहेत. या मतलबी कारवायाना बळी न पडता गरीब शेतकऱ्यानी शेतमजूरवर्गीय एकजुटीत भक्कमपणे संघटीत होण्याची हाक ही शेतमजूर परिषद गरीब शेतकऱ्याना देत आहे.

२) मध्यम शेतकऱ्यांसाठी

मुख्यतः स्वतःच्या व आपल्या कुटुंबियांच्या श्रमाने बहुतांशी स्वतःच्या मालकीची असलेली जमीन पिकवणारा आणि हंगामात काही प्रमाणात विकतचे श्रम घेणारा मध्यम शेतकरी हा शेतमजूरवर्गाचा श्रमाच्या नात्याने मित्रवर्ग आहे आणि श्रमाच्या तत्त्वावर शेतीक्रांती पार पाडण्याच्या कार्यासाठी व सहकारी पद्धतीने शेतीव्यवसायाचा व शेती-तील कष्टकऱ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी उभारावयाच्या आघाडीचा मध्यम शेतकरी घटक आहे असे शेतमजुरांची ही परिषद निःसंदिग्धपणे जाहीर करीत आहे. जमिनीच्या फेरवाटपाच्या घोषणेची अंमलबजावणी करताना या घोषणेचा मुख्य रोख जमिनदारी, मालकी व भांडवलदारी शेतकऱ्यांकडील जमीन भोगवट्याचे केंद्रीकरण यांच्याविरुद्ध राहील व स्वकष्टाने शेती करणाऱ्या मध्यम शेतकऱ्यांच्या जमिनीला कोणत्याही प्रकारे धक्का पोहोचविला जाणार नाही अशी शेतमजूर चळवळीची निश्चित भूमिका ही परिषद जाहीर करीत आहे.

भांडवली अर्थव्यवस्थेचे नियम आणि इंदिरा काँग्रेस सरकारची धोरणे व भांडवल-दारधार्जिण्या शासनयंत्रणेचा व्यवहार यामुळे सधन शेतकरी थराची भरभराट चालली आहे मध्यम शेतकऱ्यांतुन सधन थरात जाण्याचा क्रम जवळजवळ थांबलाच आहे उलट मध्यम थरातील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आतोनात वाढला असून जमीन व शेतीचा साधन सामुग्री यांना मुकण्याचा प्रसंग मध्यम शेतकऱ्यांवर ओढवत आहे व तो गरीब शेतकरी थरात खाली ढकलला जात आहे. या थरातून कारखानदारी कामगार बनणा-ऱ्यांमध्ये पूर्वी आपल्या कमाईच्या जोरावर गावी परत जाऊन सुखवस्तु शेतकरी बन-ण्याची आशा व इच्छा असे ती आज या परिस्थितीमुळे नष्ट होऊ लागल्याचा अनुभव येत आहे. मध्यम व गरीब शेतकऱ्यांतील या असंतोषावर सधन शेतकरी वर्ग शेतीमा-

लाच्या भाववाढीसारखा व शहरे विरुद्ध खेडी यासारख्या घोषणा देऊन स्वार होत आहेत. धर्म, जात, कुळी या जुन्या संस्काराचा पाया करुन दलित आदिवासी व शेतमजूर यांच्या विरुद्ध चिथावत आहेत.

बडे अधिक बडे होणे हाच भांडवली अर्थरचनेचा नियम आहे आणि मध्यम व गरीब अधिक गरीबच बनत राहतात. भांडवलशाहीच्या मार्गाने कष्टकरी शेतकरी जनतेचे प्रश्न कधीही कुठेही सुटलेले नाहीत. आपल्या देशातसुद्धा सुटणार नाहीत कामगार-वर्गाच्या श्रमिकांच्या एकजुटीच्या व सहकार्य करण्याच्या मार्गानेच स्वतःचे सरक्षण व सर्व कष्टकऱ्याबरीबर आपला सामुदायिक उत्कर्ष साधता येईल.

शेतकऱ्यांच्या वस्तूंच्या उत्पादन खर्चाची पूर्णपणे भरपाई करणारा भाव वस्तूला मिळाला पाहिजे हे स्वयंसिद्धच आहे. परंतु भांडवलशाही बाजारात असे क्वचितच घडते. बड्याचा उत्पादन खर्च दर एकरामागे वा दर पोत्यामागे कमी असतो व त्यांना अधिकाधिक भाव मिळू शकतो व मिळतो उलट गरीब व मध्यम शेतकऱ्यांना उत्पादन खर्च जास्त असतो व त्याला चांगला भाव येण्याची वाट पहाणे शक्य नसल्यामुळे पडत्या भावात नाईलाजाने विकावे लागते. शेतीमालांचे भाव वाढविल्यामुळे सधन शेतकरी अधिक सधन होतो, पण गरीब व मध्यम शेतकऱ्याला चार पैसे जास्त मिळूनसुद्धा त्याची अडचण दूर होत नाही. शासनाकडून मिळणाऱ्या सर्व सवलतीचे असेच विषम वाटप सधन शेतकऱ्याला फायदेशीर होते. या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी सधन शेतकऱ्यांच्या वर्चस्वापासून भांडवली विचारसरणीच्या प्रभावापासून मध्यम शेतकऱ्यांनी मुक्त झाले पाहिजे. स्वतःची संघटना उभारणे, स्वतंत्रपणे, स्वतःच्या प्रश्नांचा, अडचणींचा व मागण्यांचा विचार करणे व त्यासाठी संघटीत सामुदायिक आंदोलनाचा मार्ग अवलंबणे, तसेच लोकशाही पद्धतीत अंतर्भुत असलेल्या स्थानिक स्वराज्य, सहकार आदि संस्थामधील धनिकांचे वर्चस्व मोडून काढून कष्टकरी शेतकरी नियंत्रण तयार करणे व गरीब शेतकरी व शेतमजूर ग्रामीण गरीब समुदायांशी सहकार्याने चालणे या मार्गाने जाण्यासाठी मध्यम शेतकऱ्यांनी संघटित झाले पाहिजे मध्यम शेतकरी मंडळीच्या अशा प्रकारच्या प्रयत्नात शेतमजूर चळवळ त्याना साथ करील अशी ग्वाही ही परिषद देत आहे.

## १०) मुंबई कापड कामगार लढ्यामागे उभे रहा सर्व प्रकारची मदत करा.

मुंबईच्या २॥ लाख गिरणी कामगारांनी गेला महिनाभर अपूर्व एकजुटीने व धैर्याने देशातील सर्वात बलाढ्य भांडवलदार असलेल्या गिरणी मालक टोळक्याच्या विरुद्ध जो सपळढा चालवला आहे त्याबद्दल शेतमजूर परिषद गिरणी कामगारांचे हार्दिक अभिनंदन करते. देशातील कामगारवर्गाच्या आघाडीच्या तुकडीचा हा लढा जसा गिरणी कामगारांच्या स्वतःच्या आर्थिक मागण्यांसाठी आहे, त्याचप्रमाणे तो संबंध कामगारवर्गाच्या संघटना व लढा स्वातंत्र्याच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी आहे आणि

हा लढा यशस्वी झालाच पाहिजे या जाणिवेने महाराष्ट्रभरच्या शेतमजूरांनी व गरीब शेतकऱ्यांनी व कष्टकरी मध्यम शेतकऱ्यांनी या लढ्याला सर्व प्रकारे सक्रीय पाठिंबा द्यावा व श्रीमंत शेतकऱ्यांनी व इंदिरा कॉंग्रेस सरकारने या लढ्याविरूद्ध चालविलेल्या खोट्या प्रचाराचा पाडाव करुन मध्यम शेतकरी जनतेचा या लढ्याला गावोगांव पाठिंबा संघटित करावा. अडीच लाख गिरणी कामगारानी आपली शंभर टक्के एकजुटीची लढ्याची संघटना म्हणून उभारलेल्या महाराष्ट्र गिरणी कामगार युनियनशीच बोलणी करुन गिरणी कामगारांच्या न्याय्य मागण्यांची पूर्तता गिरणी मालकानी व महाराष्ट्र शासनाने करावी अशी मागणी ही परिषद करीत आहे. या मागण्यांच्या पूर्ततेकरता तशा तऱ्हेचे ठराव गावोगावी, ग्रामपंचायतीत करून सरकारकडे पाठविण्याची व लोकप्रतिनिधीकडे तशा प्रकारे आग्रही मागणी करण्याची हाक ही परिषद देत आहे.

## ११) इतर ठराव

गटसचिवांच्या न्याय्य मागण्यांना व त्यांच्या प्रदीर्घ संपाला पाठिंबा. एकजुटीने व शिस्तबद्ध चाललेल्या संपावर सरकार करीत असलेल्या दडपशाहीचा निषेध करणारा ठराव. (हा संप ता.३१-३-८२ रोजी सन्मान्य तडजोड होवून मागे घेण्यात आला.)

महाराष्ट्र सरकारच्या वेळोवेळच्या धोरण, व्यवहारामुळे व साखर कारखानदारांशी म. रा. साखर कामगार प्रतिनिधी मंडळाच्या सलगीमुळ महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या कामगारांचे आजवर नुकसान झाले. सध्याही चालू आहे. शेतीमहामंडळ कामगारांच्या, साखर कारखान्यातील कामगाराप्रमाणे कंपन्याकडे हे उसमळे असताना ज्या सारखे हक्क व सवलती मिळत होत्या त्याप्रमाणे मिळाव्या या मागणीला या परिषदेचा पाठिंबा व्यक्त करणारे ठराव या परिषदेने केले आहेत.

तसेच महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठ कामगारांनी एके ठिकाणी येऊन कृषी समिती निर्माण केली. त्यानी आपल्या मागण्यांसाठी लाक्षणीक संप केले. त्यांच्यातील जागृतीचे, जुटीचा स्वागत करणारा व त्यांच्या जुटीच्या लढ्याला पाठिंबा देणारा ठराव, वेतन, काम, निवारा, जमिन या दलित, दलित आदिवासी यांनी चालविलेल्या लढ्यांत बळी पडलेल्या नेत्यांना अभिवादन व जमिनदार, धनदांडगे आणि त्यांचे हस्तक गुंड यांच्या अत्याचाराचे भक्ष्य झालेल्याविषयी दुखवटा व्यक्त करणारा व अत्याचारांचा निषेध करणारा व मराठवाडा विद्यापीठ नामांतराला पाठिंबा देणारे ठरावही करण्यात आले आहेत. ( सविस्तर ठराव बारामती अधिवेशनांने केले आहेत. )

## १२) महाराष्ट्रातील शेतमजूर संघटनेच्या बांधणीसंबंधी

महाराष्ट्र राज्यातील शेतमजूर व रोजगार हमी कामगार या दोघांची मिळून संख्या एक कोटीच्या आसपास आहे. मानवी समाजाच्या, माणसाळलेल्या जनावरांच्या पोषणासाठी आवश्यक जिन्नस व कांही उद्योगांचा कच्चा माल तयार करण्याचे समाज-दृष्टचा अत्यंत आवश्यक काम करणाऱ्या या श्रमिकांना आजच्या भयानक महागाईत २-३ रु. इतक्या कमी वेतनावर राबवले जात आहे. या व्यवसायांत काम करणाऱ्यांमध्ये ५० टक्क्याहून अधिक स्त्रिया आहेत व त्यांचे वेतन ५ रुपयापेक्षा कमी, किमान वेतनाच्या खाली आणि निकृष्ट आहे. या परिस्थितीविरुद्ध हे समुदाय संघटित होऊन चळवळ करू लागताच ग्रामीण धनदांडगे त्यांना चिरडून टाकण्यासाठी सर्व मार्ग वापरतात. या पिळवणुकीपासून व दडपणूक, अत्याचारापासून धनिकधार्जिणे असलेले शासन मुलकी, पोलीस व न्याय्य यंत्रणा-कोणत्याही प्रकारे त्यांना संरक्षण देत नाही. अशा स्थितीत या शेतमजूर व रोजगार हमी कामगार समुदायांची स्थिती सुधारण्याचे व त्यांचे संरक्षण करण्याचे एकच साधन आहे. ते म्हणजे या समुदायांची धर्म, जात, पक्ष, लिंग इत्यादी भेदभाव निरपेक्ष गाववार अभेद्य एकी व संघटना आणि या गाववार समुदायांचे तालुका, जिल्हा, विभाग व राज्य पातळीवर केन्द्रित संकलन.

आपल्या देशातील व महाराष्ट्र राज्यातील ही ट्रेड युनियन चळवळ बलाढ्य आहे पण विभागलेली असल्यामळे व्यापक प्रश्नांच्या दृष्टीने कमकुवत आहे हा रोग या ग्रामीण चळवळीला लागला तर आधीच बिखुरलेपणामुळे कमकुवत असलेल्या या समुदायांच्या हालअपेष्टांना पारावार उरणार नाही.

म्हणून शेतमजुरांना संघटीत करण्यात प्रयत्नशील असलेल्या सर्वांना ही परिषद हाक देत आहे. त्यांनी शेतमजूर, रोजगार हमी कामगारांची एकच एक ट्रेड युनियन लोकशाही पद्धतीने चालणारी राज्यव्यापी संघटना निर्माण करावी व गाव, तालुका जिल्हा विभागवार या संघटनेच्या शाखा संघटीत कराव्या अशारीतीने या समुदायात वाढत असलेल्या वर्गीय एकजूटीच्या जाणिवेला संघटनात्मक आकार द्यावा अशीही, अपेक्षा परिषद करते.

● ●

शेतमजूर, सालदार, महिनेदार व उक्ता कामे घेणाऱ्या व रोजगार हमी कामगारांनो ता. २३ एप्रिल १९८२ रोजी गांवो-गांवी व कामाच्या ठिकाणी एक दिवसाचा संप करा. सभा मिरवणुकीने लढ्याची सिद्धता करा !

**२३ एप्रिल शेतमजूरांच्या राज्यव्यापी सार्वत्रिक संपाच्या घोषणा.**

- अकुशल शेतमजुरास १८०० निर्देशांकावर रोजी १०, १२ व १५ रुपये किमान-वेतन-मिळालेच पाहिजे.
- १८०० निर्देशांकाशी जोडलेल्या प्रत्येक पॉईटला रोजो १ पैसा महागाईभत्ता-मिळालाच पाहिजे.
- जिरायत भागात १० रु. किमानवेतन-मिळालेच पाहिजे.
- निमबागायत भागात १२ रु. किमानवेतन-मिळालेच पाहिजे.
- बारमाही बागायती भागात १५ रु. किमानवेतन-मिळालेच पाहिजे.
- १४ वर्षावरील मुलामुलींना प्रौढाइतके वेतन-मिळालेच पाहिजे.
- स्त्री-पुरुषांना समान कामाकरिता सारखे वेतन-मिळालेच पाहिजें.
- गरजूना ५ किलो मिटरच्या आत काम-मिळालेच पाहिजें.
- दूर अंतरावरील कामावर राहण्याची वा ने-आण करण्याची व्यवस्था-झालीच पाहिजें.
- काम न दिल्यास वेतनाच्या ५० टक्के बेकाम भत्ता-मिळालाच पाहिजे.
- शेतमजूर व रोजगार हमी कामगारांना प्रॉव्हिडंड फंड, ग्रॅज्युइटी, पेन्शन आदो संरक्षण-लाभलेच पाहिजे.
- किमानवेतनाची अम्मलबजावणी न करणे शिक्षापात्र गुन्हा-ठरलाच पाहिजे.
- अमानुष पिळवणुकीची कंत्राटी पद्धत रद्द-झालीच पाहिजें.
- बड्या १० टक्के जमिन मालकांच्या जमिनीचे फेरवाटप-झालेच पाहिजे.
- गरीब शेतकऱ्यांची शेती विशेष सवलतीं देऊन सहकारी पद्धतीनें - संघटीत करा.
- दलित व शेतमजूरांवरील अत्याचारांचा संघटित जुटीने -- प्रतिकार करा.
- कामाच्या ठिकाणी, गाव व तालुकावार -- संघटित व्हा.
- महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषदेचा -- विजय असो.
- श्रमिक सत्ता-झिंदाबाद ! लाल बावटे की-जय !

---

मुद्रक- एस. डी. इंगळे, कोल्हापूर जिल्हा छापखाना, नागाळा पार्क, कोल्हापूर.